# नायक्स टयुटोरिअल्स

Way to Excellence

| | | |
|---|---|---|
| वर्षे : २०२४-२०२५ | सराव प्रश्नपत्रिका क्र – १ | गुण ः८० |
| इयत्ता ः१० वी | मराठी अक्षरभारती | वेळ ः३ |

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(१) सूचने नुसार कृती व व्याकरण कृती यामधील आकृत्या काढाव्यात .
(२) आकृत्या पेनानेच काढाव्यात .
(३) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना,निवेदन इ . ) आकृतीची आवश्यकता नाही . तसेच या कृती उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहून काढू नयेत .
(४) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे .

## विभाग १ःपठित गदय

प्रश्न .१) अ) उताऱ्याच्या आधारे सूचने नूसार कृती करा .

(१) खालील विधानांचे एका शब्दात उत्तर लिहा . २

(अ) व्यक्तीचे वजन मोजण्याचे एकक –
(ब) ताटातील पदार्थ न दिसता लेखकास दिसू लागलेल्या बाबी –
(क) चाळीतल्या लोकांनी लेखकास दिलेल्या सल्ला –
(ड) लेखक राहत असलेल्या चाळीच्या नावातील पदार्थ –

''दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा!'' अशी भीष्मप्रतिज्ञा करून मी आहारशास्त्रावरच्या पुस्तकात डोके घालू लागतो. प्रोटीनयुक्त पदार्थ, चरबीयुक्त द्रव्ये वगैरे शब्दांबद्दलची माझी आस्था वाढू लागली. साऱ्या ताटांतले पदार्थ मला न दिसता नुसत्या 'कॅलरीज' मला दिसू लागल्या आणि आनंदाची गोष्ट अशी, की वजन उतरवण्याच्या शास्त्रात पारंगत झालेले तज्ज्ञ मला रोज डझनवारीने भेटू लागले. इतकेच काय, परंतु ज्या आमच्या चाळीतल्या लोकांनी माझ्या उपासाची अवहेलना केली होती, त्यांनीच मला 'डाएटचा' सल्ला दिला. उदाहरणार्थ – सोकाजी त्रिलोकेकर.

''तुला सांगतो मी पंत, 'डाएट' कर, बटाटा सोड. बटाट्याचं नाव काढू नकोस.''

''हो! 'म्हणजे कुठं राहाता?' म्हणून विचारलं तर नुसतं 'चाळीत राहातो' म्हणा, 'बटाट्याची चाळ' म्हणू नका. वजन वाढेल! खी:खी:खी: !'' जनोबा रेगे या इसमाला काय म्हणावे हे मला कळत नाही. नेहमी तिरके बोलायचे म्हणजे काय!

पण सोकाजींनी त्याला परस्पर जामून टाकले. ''ए इडिअट! सगळ्याच गोष्टींत जोक काय मारतोस नेमी? मी सांगतो तुला पंत – तू बटाटा सोड.'' मी काय काय सोडले असता माझे वजन घटेल याची यादी बटाट्यापासून सुरू झाली.

(आ) लेखकाने केलेल्या भीष्मप्रतिज्ञेनंतरचा ओघतक्ता पूर्ण करा . २

| मी आहारशासत्रावरच्या पुस्तकात डोके घालू लागलो |
|---|
| ↓ |
| |
| ↓ |
| |
| ↓ |
| |
| ↓ |
| |

(इ) स्वमत लिहा – लेखकाच्या 'डाएट' बद्दलची प्रतिक्रिया तुमच्या शब्दात लिहा . ३

प्रश्न .२) अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा .

(१) चौकटी पूर्ण करा. २

(अ) शालीमुळे शालीनता येते की जाते ☐

(आ) लेखकाचा निकटवर्ती मित्र होता - ☐ या प्रश्नाचे उत्तर काय आहे ?

(इ) २००४ च्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ☐

(ई) लेखकाच्या खोलीचा आकार ☐

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा संमेलने गाजवित. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामत: त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, "या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे."

त्यांच्या बोलण्यातील उपरोधिक खोच माझ्याच नव्हे तर कोणाच्याही सहजपणे लक्षात येणारी होती. शाल व शालीनता यांचा संबंध काय? खरे तर, खरीखुरी शालीनता शालीविनाच शोभते! सुर्वे मुळातच शालीन. शालींच्या वर्षावाखाली त्यांची शालीनता कधी हरवली नाही, कधी क्षीणही झाली नाही.

मी कविवर्यांना म्हटले, "शालीमुळे शालीनता येत असेल तर मी कर्जबाजारी होईन, भिकेला लागेन; पण शेकडो शाली खरेदी करून सर्वांना एकेक शाल लगेचच नेऊन देईन." यावर तो शालीन कवी मनापासून हसला.

शालीमुळे शालीनता येते की जाते?- या प्रश्नाचे माझे उत्तर 'जाते' असेच आहे. सन्मान करण्याच्या रूपाने आपण खरे तर एक शालीन जग गमावून बसण्याचा धोकाच मोठा आहे.

मी २००४ साली मराठी साहित्यसंमेलनाचा बिनविरोध अध्यक्ष झालो. तत्कालीन एक-दोन वर्षांत माझ्यावर शालींचा वर्षाव झाला. एवढ्या शाली जमत गेल्या, की माझ्या आठ बाय सहाच्या खोलीत त्यांना ठेवणेच शक्य नव्हते. मग मी सगळ्या शालींचे गोठोडे बांधून ते निकटवर्ती मित्राकडे ठेवले व त्या शाली वापरण्याचे वगैरे त्याला सर्वाधिकार दिले. बिचारा अतिप्रामाणिक! त्याच्याही छोट्या खोलीत त्याने ते सांभाळले.

हळूहळू मी सगळ्या शाली वाटून टाकल्या, गरीब श्रमिकांना!

(२) आ) कारणे लिहा. १

१) शालीच्या वर्षामुळे नारायण सुर्वे यांची शालीनता हरवली नाही ☐ कारण

इ) खालील कृतीतून कळणारे लेखकाचे गुण १

१) खरेतर खरीखुरी शालीनता शाली विनाच शोभते. ☐

२) हळूहळू मी सगळया शाली वाटून टाकल्या. ☐

(ई) स्वमत लिहा सन्मानाचे प्रतीक शाल याविषयी तुमचे विचार लिहा. ३

अपठित गदय

प्रश्न.२) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

(अ) खालील चौकटी भरून तक्ता पूर्ण करा. २

| उताऱ्यात वर्णन केलेले दिवस | उताऱ्यात वर्णन केलेले ठिकाण | भाताच्या ओंब्या वाकण्याचे कारण | वाऱ्याचे वैशिष्ट्य |
|---|---|---|---|
| | | | |

शेतीभातीचे ते दिवस व कापणीचा हंगाम, अगोदरच त्या गावाला झाडी अतोनात. तशात प्रात:काळचा तो समय, सूर्य नुकताच वर आला होता व त्याचे कोवळे ऊन पडून पावसाने आपल्या स्वच्छ पाण्याने स्नान घालून टवटवीत केलेल्या वृक्षांची हिरवीगार पाने अधिक सतेज दिसत होती. सभोवार कणसांवर आलेली विस्तीर्ण शेतेच दृष्टीस पडत होती. आमच्या पायांपासून तो थेट समोरच्या डोंगरापर्यंत पिवळसर हिरव्या रंगाचे गालिचेच पसरले आहेत की काय असा भास होई. मधून मधून नाचण्यांची हिरवीगार शेते दिसत. त्यामुळे असा भास होई की सृष्टिदेवी हिरव्या बुट्ट्यांनी युक्त अशी पिवळी पैठणीच नेसून विहार करीत आहे. आत दाणा झाल्याकारणाने शेतातील भाताच्या ओं आणि शेतामधून काम करणारी माणसेही मधून मधून दिसत, शीतल व सुवासिक फुलांच्या वासाने सुगंधित असा वारा झुळझुळ वाहत होता. तो शेतांवरून वाहताना समुद्रावर वर खाली होणाऱ्या लाटांप्रमाणे त्या शेतांची शोभा दिसत होती. वारा लागून त्या ओंब्याचा जो सळसळ आवाज होई तो किती मनोहर!

(आ) खालील गोष्टींना लेखकांनी दिलेल्या उपमा लिहून चौकट पूर्ण करा. २

| गोष्टी | उपमा |
|---|---|
| (१) पायापासून डोंगरापर्यंत पसरालेले शेत म्हणजे<br>(२) नाचण्यांची हिरवीगार शेत म्हणजे | (अ) . . . . . . . . . . . . .<br>(ब) . . . . . . . . . . . . . |

## विभाग २ – पदय

प्रश्न.४)अ) कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

१) चौकटीत योग्य शब्द लिहा. २

(१) विठ्ठल भेटीची ओढ व्यक्त करण्यासाठी कवीने वापरलेले दृष्टांतः

(अ) आगीत पडलेले बाळ (आ) [ ]

(इ) [ ] (ई) [ ]

(२) कवितेत उल्लेखलेला प्राणी – [ ]

अग्निमाजि पडे बाळू।
माता धांवें कनवाळू।।१।।

तैसा धांवें माझिया काजा।
अंकिला मी दास तुझा।।२।।

सर्वेचि झेंपावें पक्षिणी।
पिलीं पडतांचि धरणीं।।३।।

भुकेलें वत्सरावें।
धेनु हुंबरत धांवे।।४।।

वणवा लागलासे वनीं।
पाडस चिंतीत हरणी।।५।।

नामा म्हणे मेघा जैसा।
विनवितो चातक तैसा।।६।।

२) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा. २

(१) मेघांना विनविणारा . . . . . . . . आहे.

(२) वासरू . . . . . . . . . आहे.

(३) शब्दांचे अर्थ लिहा. २

१) दास २) धेनु ३) मेघ ४) वन

(४) नामा म्हणे मेघा जैसा विनवितो चातक तैसा' या ओळीतून व्यक्त झालेले काव्यसौंदर्य तुमच्या शब्दांत लिहा. २

प्रश्न.५)अ) खालील पैकी कोणत्याही एका कवितेवर दिलेल्या मुद्दयांच्या आधारे कृती करा.

कविता : औक्षण हिरवगांर झाडासारखं

(१) कवितेच्या कवी कवयित्रीचे नाव लिहा. १

(२) कवितेचा विषय तुमच्या शब्दात लिहा. १

(३) कवितेतून मिळणारा संदेश . २

(४) ओळींचा सरळ अर्थ लिहा . २

जीव ओवाळावा तरी जीव किती हा लहान तुझ्या शौर्यगाथेपुढे त्याची केवढीशी शाान

किंवा

पक्षी झाडांचे कुणीच नसतात तरीही झाड त्यांचे असंत

(५) शब्दांचे अर्थ लिहा . २

१) शौर्य २) जिद्द ३) डोळा ४) राखण


किंवा

१) बाहू २) पक्षी ३) मंजुळ ४) झाड

## विभाग ३ : स्थुलवाचन

प्रश्न .६) खालील पैकी कोणत्याही दोन कृती सोडवा . ६

(१) सूर्य आणि पणती यांच्यातील संवाद स्वतःच्या कल्पनेने लिहा .





(२) 'थोडयाशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस्' या विधानाची यथार्थता लिहा .

(३) 'प्रत्यक्ष अनुभवातून शिकणे हे अधिक परिणामकारक असते' हे विधान स्वानुभावातून स्पष्ट करा .

## विभाग ४ – भाषाभ्यास

प्रश्न .७) अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती . २

(१) वाक्यांचे प्रकार ओळखा .

१) अबब□केवढा मोठा हत्ती □

२) आमचा वर्ग विजयी झाला

(२) कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतार कारा . २

१) ही कल्पना ब□पिकी आहे . (नकारार्थी वाक्य करा)

२) आज गाडीत कोण गर्दी □(विधानार्थी वाक्य करा)

(३) वाक्प्रचाराचा अर्थसांगून वाक्यात उपयोग करा . (फक्त २) ४

क) उत्साहाला उधाण येणे ख) अंगाचा तिळपापड होणे घ) खूणगाठ बांधणे

आ) भाषासौंदर्य :

१) (१) खालील शब्दसमूहा बद्दल एक शब्द लिहा . १

(अ) अपेक्षा नसताना घडलेली गोष्ट –

(आ) कोणावरही अवलंबून नसलेला –

(२) खालील शब्दांसाठी योग्य समानर्थी शब्द लिहा . १

(अ) परिचय – (आ) माती –

(३) खालील शब्दांसाठी योग्य विरूद्धार्थी शब्द लिहा . १

(अ) दुष्काळ □ (आ) विश्वास □

(४) वचन बदला . १

(अ) चिठठी –            (आ) मिनिट –

२) लेखननियमांनुसार खालील वाक्ये लिहा . २

(१) पूढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मि गेला .

(२) शीक्षकांनी माझ्या पाठिवर शाबासकीची थाप दीली .


३) खालील वाक्यांत योग्य त्या विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पून्हा लिहा . २

(१) राधा : आई हे काय आहे ग कोपऱ्यात

(२) ही कोकण गाडी किती छान दिसते पण दिसते न दिसते तोच लगेच बोगदयात शिरते

विभाग ५ – उपयोजित लेखन

प्रश्न .८)अ)(१) खालील निवेदन वाचा व दिलेल्या कृतीपैकी एक कृती सोडवा . ६




किंवा

(२) विभाग १ गदय कृती मधील 'इ' अपठित गदय उताऱ्याचे एक तृतीयांश शब्द मर्यादित सारांश लेखन खरा .

प्रश्न .९)अ) खालील कोणत्याही <u>दोन</u> कृती सोडवा . १०

१) खालील शब्दांचा उपयोग करून जाहिरात तयार करा . ५



गुरूपुष्यामृत योग, सुवर्णालंकार



२) खालील विषयावर बातमी तयार करा . ५

रेल्वे प्रवासात नागरिकांजवळ स्वओळखपत्र असणे अनिवार्य .

(आधार कार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स् ,वोटिंग/इलेक्शन कार्ड (मतदान पत्रिका) यापैकी कोणतेही एक)

३) कथा लेखन : शीर्षकावरून कथा लिहा . 'खरी मैत्री' ५

प्रश्न .१०) खालील पैकी एका विषयावर लेखन करा . (१०० ते १२० शब्द) ८

१) आत्मकथन

- मी माजी सैनिक बोलतोय
  - सैन्यदलात प्रवेश
  - जीवनाचे सार्थक
  - शौर्याचा प्रसंग
  - परिणाम

२) प्रसंग लेखन

मी पाहिलेली गावची जत्रा
↓
युवकांचा सहभाग
↓
देवळाची सजावट
↓
देवदर्शन
↓
जत्रेची मजा घेणे

३) वैचारिक

मी माझ्या देशाचा नागरिक जबाबदार नागरिक – हक्क व कर्तव्ये – सदयःस्थितीचे आकलन – नागरिक म्हणून वर्तन – देशप्रेम व भविष्यातील भारत

****________****